# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFICTION/ 61 /2018
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग,यांचे कार्यालय,तीन हात
नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :–10092018
दुरध्वनी क्रमांक 022- 25401056

**–:वाहतूक नियंत्रण अधिसुचना:–**

ठाणे शहरातील कळवा वाहतूक उपविभागाच्या हद्दीत १) विटावा घाट, २) शिवाजी चौक गणेश घाट, ३) खारेगांव तलाव, ४) पारसिक रेतिबंदर–गणेश घाट येथे गणेश मुर्तीचे विसर्जनाचे दिवशी म्हणजे दि. १४/०९/२०१८ ,दि. १७/०९/२०१८, दि. १९/०९/२०१८ व दि. २३/०९/२०१८ रोजी मोठया प्रमाणात सार्वजनीक तसेच खाजगी गणेश मुर्तीचे विसर्जन होते. गणेश मुर्ती विसर्जन मिरवणूकीचे मार्गावरील व विसर्जन घाटाचे परिसरात वाहतूक कोंडी होवू नये वाहतूक सुनिश्चित व्हावी या करीता आम जनतेच्या साईसाठी,

महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी अमित का. काळे , पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग, ठाणे शहर पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

१) नवी मुंबई बेलापूर रोडने तसेच ऐरोली– पटणी मार्गे विटावा जकात नाका – कळवा शिवाजी चौकातून ठाण्याचे दिशेने येणाऱ्या जड–अवजड वाहनांना व टी.एम.टी./एन.एन.एम.टी./एस.टी. व खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेसना **विटावा जकात नाका** येथून **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग** :– अ) सदरची जड अवजड वाहने ही ऐरोली –मुलूंड–आनंदनगर जकात नाका–पुर्व द्रूतगती महामार्गावरून इच्छित स्थळी जातील.
ब) टी.एम.टी./एन.एन.एम.टी./एस.टी. व खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेस हया विटावा जकात नाका येथे प्रवासी उतरवून तेथूनच प्रवासी भरून परत नवी मुंबई कडे इच्छित स्थळी जातील.

२) पूर्व द्रुतगती महामार्ग ( रा.म.क्र. ३ ) वरील गोल्डन डाईज नाका येथून ठाणे शहरातून मिनाताई ठाकरे चौक–जी.पी.ओ. नाका –क्रिक नाका –कळवा मार्गे नवी मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या जड –अवजड वाहनाना **गोल्डन डाईज नाका** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग** :– सदरची वाहने ही गोल्डन डाईज नाका–येथूनच पूर्व द्रुतगती महामार्गवरून कॅडबरी जंक्शन–नितीन जंक्शन –तीनहात नाका –कोपरी ब्रिज वरून आनंदनगर नाका–मुलूंड मार्गे इच्छित स्थळी जातील.

३) रा.म.क्र. ३ खारेगांव टोल नाका येथून मुंब्रा बायपास मार्गे नवी मुंबई च्या दिशेने गॅमन नाका (गणेश विसर्जन घाट) रेतिबंदर पारसिक सर्कल – मुंब्रा बायपास मार्गे जाणाऱ्या जड–अवजड वाहनांना **खारेगांव टोल नाका** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग** :– सदरची वाहने ही रा.म.क्र.३ खारेगांव टोल नाका येथून सरळ–गोल्डन डाईज नाका –कॅडबरी नाका–नितीन कंपनी नाका–तीनहात नाका –कोपरी ब्रिज वरून –आंनदनगर जकात नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

४) बाळकुम नाका –साकेत –क्रिक नाका येथून शिवाजी चौक –कळवा च्या दिशेने जाणाऱ्या जड अवजड वाहनाना **बाळकुम नाका** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग** :– सदरची वाहने ही बाळकुम–कापूरबावडी नाका–गोल्डन डाईज नाका –कॅडबरी नाका–नितीन कंपनी नाका–तीनहात नाका –कोपरी ब्रिज वरून –आंनदनगर जकात नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

५) नवी मुंबई – पनवेल बाजूकडून तसेच कल्याण –मानपाडा –बदलापूर –अंबरनाथ कडून मुंब्रा –ठाणेच्या दिशेने येणाऱ्या जड–अवजड वाहनांना **शिळ फाटा** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**<u>पर्यायी मार्ग</u>** :– सदरची वाहने शिळ फाटा येथून महापे रोडने–रबाले–ऐरोली ब्रिज–मुलूंड–आनंदनगर चेका – पूर्व द्रुतगती महामार्गावरून इच्छित स्थळी जातील.

६) शिळ फाटा येथून मुंब्रा बायपास मार्गे घोडबंदर रोड –नाशिक बाजूच्या दिशेने येणाऱ्या जड –अवजड वाहनाना **<u>शिळ फाटा</u>** येथे **<u>प्रवेश बंद</u>** करण्यात येत आहे.
**<u>पर्यायी मार्ग</u>** :– सदरची वाहने शिळ फाटा येथेच यु टर्न घेवून परत महापे रोडने–रबाले–ऐरोली ब्रिज –आनंदनगर चेक नाका– पूर्व द्रुतगती महामार्गवरून इच्छित स्थळी जातील.

७) मुंब्रा बाजूकडून पारसिक नाका मार्गे खारेगांव टोल नाका व ठाण्याचे दिशेने येणाऱ्या टी.एम.टी. व खाजगी बसेसना **<u>पारसिक सर्कल</u>** येथून **<u>प्रवेश बंद</u>** करण्यात येत आहे.
**<u>पर्यायी मार्ग</u>** :– सदरच्या बसेस हया पारसिक सर्कल येथे प्रवासी उतरवून तेथूनच प्रवासी घेवून परत मुंब्रा बाजूकडे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसचुना ही गणेश मुर्ती विसर्जनाचे दिवशी म्हणजे दि. १४/०९/२०१८ ,दि. १७/०९/२०१८, दि. १९/०९/२०१८ व दि. २३/०९/२०१८ दुपारी १२.०० वा. पासून गणेश मुर्ती विसर्जन कार्यक्रम संपे पर्यंत अंमलात राहिल. सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका,गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( अमित का. काळे )
पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग
ठाणे शहर

प्रति,
जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सादर</u>**
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी ,ठाणे.
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे/भिवंडी/कल्याण.
पोलीस उपायुक्त, परिमंडळ–१ ठाणे व ५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे /नवी मुंबई.

प्रतः– <u>पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर</u>
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– <u>समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे</u>
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– <u>सपोआ वाहतूक विभाग, ठाणे/कल्याण व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.</u>
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.